**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६६/२०२२ मध्ये**
**निशाणी क्र.१ वर आदेश.**

प्रस्तुतचा अर्ज भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार हयांचे कथन असे आहे की, अर्जदार तसेच सामनेवाला क्र.१ व सामनेवाला क्र.२ हयांचे भाऊ मयत नंदकुमार उर्फ नंदू नाना बांगारे हयांचे दिनांक ३१/१२/२०१९ रोजी मौजे कलोते गावाचे हद्‌दीत, पुनम हॉटेल जवळ, मुंबई—पुणे राष्ट्रीय महामार्ग ४ हायवे येथे अपघाती मृत्यु झाला आहे. मयत नंदकुमार उर्फ नंदू नाना बांगारे हे हयात एच.डी.एफ.सी. बॅक शाखा मोहोपाडा बचत खाते क्र.५०१०००७८६९६१२० असून डेबिट कार्ड नंबर ६५२१६६०१०५२६४७०७ असा आहे. सदर डेबिट कार्डवर रूपये ५ लाखा रूपयाचा वैयक्तीक अपघात विमा असून रूपये ५,००,०००/— (अक्षरी पाच लाख रूपये) एवढी रक्कम आहे. सदर रक्कम अर्जदारास मिळणेबाबत एच.डी.एफ.सी. बॅक शाखा मोहोपाडा येथे चौकशी केली असता, त्यांना सक्षम न्यायालयाकडून ती मयत नंदकुमार उर्फ नंदू नाना बांगारे हयांची कायदेशीर वारस असलयाबाबत वारस दाखला आणणेस सांगितला. त्यामुळे सदरची रक्कम मिळण्याकरीता अर्जदार हयांचे नावे वारस दाखला मिळावा यासाठी सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

३. दिनांक ०३/१२/२०२२ रोजीच्या दैनिक सागर रायगड या वर्तमानपत्रात जाहीरनामा निशाणी क्र.२५ वर प्रसिध्द करण्यात आला व अर्जाबाबत कोणाचीही काहीही हरकत असल्यास ती मागविण्यात आली. परंतु सदर प्रकरणात आजपावेतो कोणीही हरकत घेतलेली नाही म्हणुन प्रकरण हे बिनविरोध राहिले आहे.

४. खालील मुददे माझेसमक्ष विचारार्थ उपस्थित होतात. त्या मुददयांपुढे मी माझे निष्कर्ष नोंदविले असुन त्यांची कारणमिमांसा त्याखाली केली आहे.

| मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे वारसा दाखला मिळण्यास हक्कदार आहे काय ? | ... होय |
| २. | आदेश काय ? | ... अंतिम ओदशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

५. अर्जदार हयांनी आपले कथन शाबित करण्यासाठी **नि.क्र.१२** वर सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र, **नि.क्र.१५** सामनेवाला क्र.१ व २ हयांचे म्हणणे, **नि.क्र.१९** मयत नाना दगडू बांगारे हयांच्या मृत्युप्रमाणपत्राची मुळप्रत, **नि.क्र.२०** मयत नंदू नाना बांगारे हयांच्या मृत्युप्रमाणपत्राची मुळप्रत, **नि.क्र.२१** मयत पदी नाना बांगारे हयांच्या मृत्युप्रमाणपत्राची मुळप्रत, **नि.क्र.२२** एच.डी.एफ.सी. बॅक खात्याच्या पासबुकची प्रत, **नि.क्र.२३** एच.डी.एफ.सी. बॅक मोहोपाडा हयांचे पत्र, **नि.क्र.२४** अर्जदार क्र.१ हयांची आधारकार्डाची पडताळणी प्रत, **नि.क्र.२५** वर जाहिर नोटीस दाखल केलेली आहे.

६. याउलट, अर्जदाराचे कथन हे बिनविरोध राहिलेले आहे. म्हणुन अर्जदार यांच्या नावे वारसा दाखला देण्यास कोणतीही हरकत नाही. एकंदरीत वरील चर्चेनुसार मी मुददा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवुन मुददा क्र.२ च्या निष्कर्षाकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज मंजुर करण्यात येतो.

२ अर्जदार श्रीमती. वनिता माळू भरबुडे हयांना मयत नंदकुमार उर्फ नंदू नाना बांगारे हयाचे एच.डी.एफ.सी. बॅक शाखा मोहोपाडा बचत खाते क्र. ५०१०००७८६९६१२० असून डेबिट कार्ड नंबर ६५२१६६०१०५२६४७०७ असा आहे. सदर डेबिट कार्डवर ५ लाख रूपयाचा वैयक्तीक अपघात विमा असून त्याच्या अपघातानंतर रू.५,००,०००/— (अक्षरी पाच लाख रूपये) इतकी रक्कम मिळण्या संदर्भात वारस दाखला योग्य ती कोर्ट फी भरून देण्यात यावा.

३ येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

Digitally signed by LATA KIRAN SAPKAL
Location: Khalapur, Dist Raigad
Date: 2023.08.22 16:05:26 +0530

ठिकाण: खालापूर. ( ल. कि. सपकाळ )
दिनांक : २२/०८/२०२३. २रे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खालापूर.